**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने दि.३१.८.२०१३ रोजी संमत केलेला ठराव क्रमांक १२८**

**ठराव**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ महाराष्ट्र अधिनियम क्र.१० सन २०१० सुधारणांनुसार चे कलम १२७ चे पोटकलम १ (अ) कलम १२८ (क) कमल १२९ तसेच अनुसूची प्रकरण ८ चे नियम ७ (क) व त्या मधील प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्तीचा वापर करुन आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यानी इमारतीच्या व जमिनीच्या प्रवर्गाचा तपशिलाच्या बाबतीत विविध प्रवर्गाना नेमुन द्यावयाच्या बहुविध भारांकाच्या आधारे जमिनी व मालमत्तांचे भांडवली मुल्य निश्चीत करण्याचे नियमास मान्यता देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या दिनांक २६.६.२०१२ च्या सभेत सादर केला होता परंतु यास स्थायी समितीची मान्यता न मिळू शकल्यामूळे या प्रस्तावावर निर्णय न घेतल्यामूळे आयुक्त नांवामनपा नांदेड यांची मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ मधील सुधारण क्र.१२/२०११ दि.२१ मे २०११चे कलम ३६ (ख) नुसार सदरील नियमास मान्यता गृहित धरुन कार्यालयीन आदेश क्र. नांवाशमनपा/कर वि./करवि/९४२/२०१२ दि.१७.५.२०१२ मान्यता दिली व त्यानुसार इमारतीच्या व जमिनीच्या प्रवर्गाचा तपशिलाच्या बाबतीत विविध प्रवर्गाना नेमुन द्यावयाच्या बहुविध भारांकाच्या आधारे जमिनी व मालमत्तांचे भांडवली मुल्य निश्चीत करण्याचा नियम लागू करुन कर आकारणी करण्यात आली .त्या अनुषंगाने सर्वसाधारणा सभेने शहरातील नागरीकांचा व संघटनांचा आणि विविध राजकीय पक्षाचा विरोध लक्षात घेवून सदरील नियम व भांरांकाबाबत अभ्यास करुन अहवाल सादर करण्याकरीता मा. महापौराच्या अध्यक्षतेखाली ठराव क्र.३७ दि.२.४.२०१३ अन्वये एक समिती गठीत केली होती. त्यानुसार उपसमितीने अभ्यास करुन बाजार मुल्य दर तक्ता (रेडीरेकनर) नुसार शहरातील जमिनी, स्वतंत्र इमारती व मालकी तत्वावरील सदनिका व दुकाने याची कर आकारणी करण्याकरीता शिफारस उपसमितीने केली. खालील प्रमाणे शिफारशीस ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

१) सामान्य कराचा दर ०.३ ऐवजी ०.१५ या दराने करण्यात यावा व कर आकारणी सन २०११.२०१२ पासूनच्या ऐवजी चालू वर्षापासून म्हणजे सन २०१३-२०१४ पासून लागू करण्यात यावी.व मागील दोन वर्षाची जून्या मालमत्ताची कराची रक्कम निर्लेखित करण्यात यावी. परंतू सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ यावर्षामध्ये ज्या नविन इमारती अस्तित्वात आल्या आणि त्या इमारतीचा कर आकारणी भांडवली मुल्य पध्दतीने करण्यात आली असेल तर त्यांची तीच कर आकारणी अंतिम समजण्यात यावी परंतु सामान्य कराचे दर ०.१५ टक्के ठेवून लागू होणा-या करापोटी त्यांनी जमा केलेली रक्कम पुढील वर्षात समायोजित करावी

२) प्रशासनाने जून्या मालमत्तांना ४० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या इमारतीचा भारांक ०.८० दिला आहे त्याऐवजी तो ३० वर्षावरील सर्व इमारतीकरीता घसारा ०.६० टक्के करण्यात यावा.

३) दि.४.१.२००८ पुर्वीच्या कोणत्याही अनाधिकृत इमारतीना अनाधिकृत बांधकाम शास्ती लावण्यात येवू नये.तसेच तात्पुरती बांधकामे जसे टिनशेड,पार्टीशन,म्हणजेच बांधकाम (वर्गवारी ड ) यांना अनाधिकृत बांधकाम शास्ती लावण्यात येवू नये.तसेच एखाद्या इमारतीचे परवानगीपेक्षा जास्त बांधकाम झाले असेल तेवढयाच अनाधिकृत बांधकामास अनाधिकृत बांधकाम शास्ती लावण्यात यावी.

४) काही भागातील शिघ्रसिध्द गणकामधील दरामध्ये चुक झाली आहे उदा.गाडीपूरा,फत्तेबुरुज त्या बाबतीत सह निबंधकाशी संपर्क करुन त्यात दुरुस्ती प्रस्तावित करण्यात यावी.

५) सामान्य कराचे दर कमी केल्यामुळे काही मालमत्ताना मागील कर आकारणीत लागु असणा-या करापेक्षा सामान्य कर कमी होत असलेतर पुर्वीचे कर कायम ठेवण्यात यावेत

६) मंदीर मस्जिद, गुरुव्दारा,चर्च ई. धार्मीक संस्थांच्या दुकानांना नियमातील तरतूदीनूसार नाममात्र कर आकारणी करणे शक्य असल्यास त्यास नाममात्र कर आकारणी करावी.

७) सार्वजनिक विश्वस्थ संस्थेच्या सर्व वापर प्रकाराच्या इमारतींना निवासी दराने कर आकरणी करण्यात यावी.

८) प्रशासनाने पाठविलेल्या नोटीसीबाबत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या विविध प्रकारच्या बातम्यांमुळे नागरीकांत संभ्रम निर्माणहोवून मालमत्ता कराबाबत आक्षेप दाखल केलेला नाही त्या सर्वांनाही उपरोक्त सर्व बाबी लागू राहतील,अशी कार्यवाही करावी.

**९ ) नियम ५ भाग ३ खालील वापर प्रकाराचे भारांकात घट करण्यात येते**

१) सर्व शैक्षणिक संस्था १.००

नियम क्र.-५ ( भाग-४)

| | |
|---|---|
| १) औद्योगिक वसाहत | १.५० |
| २) सेवा उद्योग वसाहत | १.५० |
| ३) वर्कशॉप | २.०० |
| ४) कारखाना | २.०० |

१०) तरोडा खुर्द व बुद्रूक भागातील मालमत्तांना अधिनियमातील तरतूदीनूसार टप्याटप्याने कर आकारणी लागू करावी

महापौर,
नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका, नांदेड.

C. 997

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने दि.२८.१.२०१४ रोजी संमत केलेला ठराव क्रमांक १९५**

ठराव

राज्यातील सर्व महानगरपालिका हद्दीत झालेले सर्व अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या संदर्भात शासन स्तरावर विचार विनिमय चालू असून लवकरच शासन निर्णय अपेक्षित असल्यामूळे सभागृहातील सर्व स.सदस्यांनी केलेली मागणी विचारात घेता सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकांनी अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत अशा मालमत्ताधारकाना अनाधिकृत बांधकामाची जी शास्ती लावण्यात आलेली ती अन्यायकारक असल्यामूळे मालमत्ताधारकांना आपली अनाधिकृत बांधकामे हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत/गुंठेवारी योजने नियमित करण्यासाठी दि. ३१ मार्च २०१५ पर्यतची मुदत देण्यात यावी व त्यांनंतर अनाधिकृत बांधकाम झालेल्या इमारतीनां मालमत्ता करात शास्ती लावण्याच्या संदर्भात सर्वसाधारण सभा निर्णय घेईल तुर्त चालू आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकाना अनाधिकृत बाधकामाची शास्ती लावण्यात आलेली ती शास्ती मागणी बिलातून कमी करण्यात यावी, असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमत संमत करते.तसेच यापुर्वी महासभेने पुनरकर आकारणी करण्याच्या सदर्भात जो निर्णय घेतला त्या निर्णयाप्रमाणे मालमत्ताधारकांना मालमत्ता कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याचे पुनरनिरिक्षण करण्यात यावे. चुकीच्या मालमत्ता कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या असेल तर त्या दुरुस्त करण्यात याव्यात असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते,नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी .

तसेच सन २०१३-२०१४ चे कर मागणी बिले माहे डिसेंबर २०१३ ते जानेवारी २०१४ मध्ये देण्यात येत आहेत त्यामूळे चालू वर्षाचा कर माहे डिसेंबर २०१३ नंतर भरणा केल्यामूळे २ टक्के शास्ती लावण्यात येवू नये.व दि.२८ फेब्रूवारी २०१४ पर्यत जे मालमत्ता धारक चालू वर्षाचा पूर्ण कर भरणा करतील त्यांना २ टक्के सुट मालमत्ताकरात देण्यात यावी व थकबाकीवरील शास्ती १०० टक्के माफ करण्यात यावी यापुर्वी भरणा केलेली वरील प्रमाणे प्राप्त होणारी सुट व माफीची रक्कम पुढील वर्षात समायोजन करण्यात यावी तसेच जानेवारी ते मार्च २०१४ कालावधीकरीता दरमहा २ टक्के शास्ती लागणार नाही असे ही ही नांवामनपा सर्वानुमते संमत करते. या ठरावाची तात्काळ अमलबजावणी करण्यात यावी व या योजनेचा प्रचार व प्रसार आकाशवाणी ,वृत्तपत्रो याव्दारे करण्यात यावा. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका.नांदेड

क.वि
89
10/2/14

Tax-२०१२

(1)

**आदेश**

जा.क्र.नांवाशमनपा/करवि/12675 /2013
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक :- 16/ 09/ 2013

विषय:- मुल्याधारीत पध्दतीने मालमत्ता कर आकारणी 2011-12 आक्षेपाबाबत.

संदर्भ:- 1.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 चा सुधारणा अधिनियम क्रं.10 सन 2010
2.सर्वसाधारण सभा ठराव क्रं.135 दि.30 डिसेंबर.2010
3.कार्या.आदेश क्रं./करवि/2118/2011 दि.14.07.2011
4.स्थायी समिती प्रस्ताव क्र/ करवि/942/2012 दि.17.05.2012
5.भारांक नियम आदेश क्र.करवि/6347/2012 दि.03.11.2012
6.सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 37 दि.02.04.2013
7.सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 128 दि.31.08.2013

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 चे अनुसुची "ड" प्रकरण "8" कराधान नियमाचे नियम 21 नुसार किमान चार वर्षातून एकदा नव्याने कर आकारणी पुस्तक तयार करण्याची तरतुद आहे. त्यानुसार संदर्भ क्र.1 द्वारे महाराष्ट्र शासनाने मालमत्ता कर आकारणीकरीता भांडवली मुल्याधारीत कर आकारणी पध्दत अवलंबण्याचा पर्याय उपलब्ध करुन दिला आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांची कर आकारणी सन 2005-06 मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर सन 2009-10 मध्ये तरोडा खु. व तरोडा बु. ग्रामपंचायत व ब्रम्हपुरीचा भाग महापालिकेत समाविष्ट करण्यात आला आहे. नियमानुसार सन 2009-10 मध्ये नवीन कर आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक होते परंतू ते तयार झाले नाही. त्यानंतर सन 2010-11 मध्ये सर्वसाधारण सभेसमोरे भांडवली मुल्याधारीत पध्दतीने महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांची कर आकारणी करण्याबाबत सर्वसाधारण सभेने संदर्भ क्र.2 द्वारे तत्वतः मान्यता दिली. त्यानुसार नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे भारांक नियम स्थायी समितीसमोर संदर्भ क्र. 3 नुसार सादर करण्यात आले त्यासंदर्भात स्थायी समितीने नियमाचा अभ्यास करण्याकरीता उपसमिती नेमली होती, तत्पश्चात महापालिकेच्या निवडणुका झाल्याने या उपसमितीची बैठक झाली नाही. तसेच संदर्भ क्र. 4 नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 ची सुधारणा क्र.12 /2011 दि.20 मे 2011 नुसार या नियमाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आदेश पारित केले. महानगरपालिकेच्या दैनंदिन खर्चात झालेली वाढ व विकास कामांकरीता उभारलेले कर्जाचे हप्ते फेडणे याकरीता महापालिकेच्या उत्पन्न स्त्रोतांमध्ये वाढ करणे अनिवार्य झाले व जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेच्या रिफॉर्मची पुर्तता करणे आवश्यक झाले तसेच महालेखाकार नागपुर यांच्या लेखा आक्षेपाचे निराकरण करणे(लेखा आक्षेप LAPII / AM-६२ दि.24.11.2011) आवश्यक झाले त्यानुसार शहरातील मालमत्ताची कर आकारणी भांडवली मुल्याधारीत पध्दतीने करण्यात आली.

शहरातील मालमत्तांचे भांडवली मुल्यांकन करताना रेडीरेकनर (बाजार मुल्यदर तक्त्यानुसार) खालीलप्रमाणे करण्यात येते.

1.खुल्या जमीनीचे भांडवली मुल्य (LCV) = बाजार मुल्यदर तक्त्यानुसार जमीनीचे दर (RR) X भुंखडाचे क्षेत्रफळ(AL) X वापर भारांक (UC) X बांधकाम परवानगी देय जागा (FSI)
LCV = RR x AL x UC x FSI

2.इमारतीचे भांडवली मुल्य = बाजार मुल्यदर तक्त्याआधारे इमारत बांधकामासाठीचे दर (BV) X बांधकाम क्षेत्रफळ (Cns) x वापराच्या वर्गीकरणानुसार भारांक (UseF) X इमारतीच्या बांधकाम वर्षानुसार भारांक (BAge F) X मजल्याचा भारांक (Floor F)+ जमीन मुल्यांकन (LCV)
BCV= BV x Cns x UseF x BAge F x Floor F + LC

3.मालकी तत्वावर दुकाने / सदनिका - रेडीरेकनर दराने मुल्यांकन (RR) X क्षेत्रफळ (B Area) X वापर प्रकार (UC) X वर्ष भारांक (AF) X मजला भारांक (FF) (यामध्ये जमीनीची किंमत लागू होणार नाही.)
OCV=RR (SHOP/FLAT Rate) x B Area x UC x B Age x FF

कृ.मा.प.

4 मोबाईल टावर,इतर टॉवर व संयंत्र - मशिनरी किंमत (MV) X वापराच्या वर्गीकरणानुसार भारांक (UC) X इमारतीचा बांधकाम दर ( RR ) X इमारतीच्या बांधकाम वर्षानुसार भारांक (B Age) X मजल्याचा भारांक (FF) बांधकाम क्षेत्रफळ (B Area )+ जमीन मुल्यांकन ( जमिनीवरील टावर असेल तर लागु ) M CV = MVxUCx RR x AF x FF x BArea + जमीन मुल्यांकन

यानुसार संदर्भ क्र. 5 नुसार शहरातील मालमतांची कर आकारणी करण्यात आली, संदर्भ क्र. 1 मधील तरतुदीनुसार 500 चौ.फुट निवासी चटई क्षेत्रफळाच्या मालमत्ता वगळून इतर सर्व मोकळया जागा / भुखंड इमारती व संयत्र यांची कर आकारणी करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 चे प्रकरण '8' नियम 15 (2) व 20 (2) नुसार मालमत्ताधारकांना खास नोटीस देण्यात आल्या आहेत.

सदरील खास नोटीसबाबत नियम 16 (2) व (2) नुसार 21 दिवसात आक्षेप दाखल करण्याच्या तरतूदीनूसार महानगरपालिका अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयाकडे खालीलप्रमाणे आक्षेप दाखल झाले आहेत त्याची सुनावणी क्षेत्रीय कार्यालयात घेण्यात आली आहे.

| अ.क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नांव | प्राप्त आक्षेप |
|---|---|---|
| 1 | क्षेत्रिय कार्यालय क्र. 1 | 2970 |
| 2 | क्षेत्रिय कार्यालय क्र. 2 | 8225 |
| 3 | क्षेत्रिय कार्यालय क्र. 3 | 2770 |
| 4 | क्षेत्रिय कार्यालय क्र. 4 | 4900 |
| 5 | क्षेत्रिय कार्यालय क्र. 5 | 2496 |
| 6. | क्षेत्रिय कार्यालय क्र. 6 | 2374 |

आक्षेपामध्ये खालील प्रमुखत: आक्षेप नोंदविले गेले आहेत.

1.कर जास्त आहेत कमी करावेत.

2.नागरी सुविधा नाहीत कर कमी करायेत.

3.अनाधिकृत बांधकाम जितके आहे तेवढयाच बांधकामाच्या भागास शास्ती लावावी.

4.नवीन कर मान्य नाहीत.

5.रेडीरेकनर पध्दतीने कर आकारणी मान्य नाही.

6.कर आकारणी चालु वर्षापासून लागु करावी.

7.घर जुनेच आहे कर वाढ करु नये.

शहरातील नागरीकांनी, विविध पक्ष व शहर विकास समितीने महानगरपालिकेस निवेदने व मोर्चाद्वारे या कर आकारणीस विरोध दर्शवून कर आकारणी रद्द करणे, कमी करण्याबाबत विनंती अर्ज / निवेदन सादर केली, तसेच सर्वसाधारण सभेने या सर्वाची नोंद घेऊन मालमत्ताधारकांना कर आकारणी सुसहय व्हावी याकरीता सर्व पक्षीय उपसमिती गठीत करुन तसेच करआकारणी नियम / भारांक व दर याबाबत वेळोवेळी बैठका घेउन उपसमितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन चर्चेअंती सर्वसाधारण सभेने संदर्भ क्र.6 नुसार खालीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत उपरोक्त सर्व परिस्थिती व सर्व बाबीचा विचारकरता शहरातील मालमत्ताधारकांना कर आकारणी अंतिम करताना आकारलेल्या करात खालील सुधारणा करुन नियमाशी सुसंगत व कर आकारणी सुसहय होणे विरोध कमी करण्याकरीता दाखल आक्षेपाबाबत खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येतो. (शासन मान्यता गृहीत धरुन )

1.सामान्यकर 0.3% दराऐवजी 0.15% दराने लावण्यात येतो. सन 2013-14 पासून ह्या कराची आकारणी व मागणी करण्यात येते तसेच सन 2011-12 ते 2012-13 मध्ये नविन इमारती अस्तित्वात आल्या, त्यांनाही या दरानेच मागणी करण्यात येते जर भरणा केलेली रक्कम जास्त असेल तर सदर रक्कमेचे पुढील वर्षात समायोजन करण्यात येईल. उपरोक्त संदर्भ क्र.7 अन्वये महानगरपालिकेच्या महासभेने सन 2011-12 ते 2012-13 या दोन वर्षातील वाढीव कराची रक्कम निलेखीत करण्यास मान्यता दिलेली आहे. जर सामान्य कराचे दर कमी केल्यामुळे मागील सामान्य कर आकारणीत लागू असणा-या करापेक्षा सामान्य कर कमी होत असेल तर पुर्वीचेच कर कायम ठेवण्यात येतात.

2.जुन्या इमारतींना 40 वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या इमारतीनां 0.80 इतका भारांक दिला आहे त्याऐवजी 30 वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या इमारतीना 0.60 भारांक मान्य करण्यात येतो.

3.दि. 04.01.2008 नंतरच्या अनधिकृत बांधकामांना अनाधिकृत बांधकाम शास्ती लावण्यात येते.

4. रेडीरेकनर मौजा / विभाग क्र. 1-12 चे दर सन 2011 करीता रु. 28000/- दर्शविले आहे त्या बाबत खुलासा मागविला आहे, परंतु त्या मौजा व विभागाचे नंतरचे दर अवलोकनानंतर सन 2011 चे दर 2800/- असे निश्चीत करण्यात येतात (विभागिय कार्यालयाकडून मान्यता अपेक्षीत धरुन)

5.सार्वजनिक विश्वस्त संस्थाच्या इमारती ज्यांच्यापासून भाडे प्राप्त होत नाही व त्यांचा सार्वजनिक वापर विनामोबदला करण्यात येतो अशा मालमत्तांचा वापर काहीही असला तरी त्या मालमत्तांना निवासी भारांक आकारण्यात येतो.

6.महानगरपालिका हद्दीतील सर्व शैक्षणिक संस्थांना निवासी दराने भारांक लावून मालमत्ता करआकारणी लागु करण्यात येते.

7. औद्योगिक वसाहतीतील वापर भारांकात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येते.

| अ.क्र | क्षेत्र | पुर्वीचा भारांक | सुधारीत भारांक |
|---|---|---|---|
| 1. | औद्योगीक वसाहत | 2.50 | 1.50 |
| 2. | सेवा उद्योग | 2.10 | 1.50 |
| 3. | वर्कशॉप | 2.50 | 2.00 |
| 4. | कारखाना | 2.50 | 2.00 |

8. तरोडा खु व तरोडा बु. ग्रामपंचायत क्षेत्राचा समावेश सन 2009-10 मध्ये महापालिकेत झाला असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 चे प्रकरण 11 कलम 129 (अ)(3) अनुसार

| अ.क्र. | साल सन | कराची टक्केवारी |
|---|---|---|
| 1. | सन 2009-10<br>सन 2010-11 | ग्रामपंचायत कर |
| 2. | सन 2011-12 | महापालीकेच्या सामान्य कराच्या 20% किंवा ग्रामपंचायतचा लागु कर यापैकी जो जास्त असेल तो |
| 3. | सन 2012-13 | महापालीकेच्या सामान्य कराच्या 40% किंवा ग्रामपंचायतचा लागु कर यापैकी जो जास्त असेल तो |
| 4. | सन 2013-14 | महापालीकेच्या सामान्य कराच्या 60% किंवा ग्रामपंचायतचा लागु कर यापैकी जो जास्त असेल तो |
| 5. | सन 2014-15 | महापालीकेच्या सामान्य कराच्या 80% किंवा ग्रामपंचायतचा लागु कर यापैकी जो जास्त असेल तो |
| 6. | सन 2015-16 | महापालीकेच्या सामान्य कराच्या 100% किंवा ग्रामपंचायतचा लागु कर यापैकी जो जास्त असेल तो |

यानुसार कर लावण्यात येतो उपरोक्त सर्व सुधारणांनुसार वार्षीक कराची मागणी निश्चीती करुन वरील कोष्टकात नमुद केल्याप्रमाणे तरोडा भागातील कर मागणी अंतिम करण्यात येते.

9.मालमत्तेचे नजर चुकीने बांधकाम दर्जा, क्षेत्रफळ, वापर, बांधकाम वर्ष यामध्ये चुक असेल तर त्याची स्थळपाहणी / लेखी पुरावा याआधारे सुधारणा करण्यात येते व त्यानुसार दुरुस्तीस अनुसरुन कर लागु करण्यात येत आहेत.

यापमाणे सुधारीत करण्यात आलेली करआकारणी यादी ही महानगरपालिकेची अंतीम कर आकारणी यादी सन 2011-12 म्हणुन निश्चीत करण्यात येते तसेच सन 2013-14 पासून कराची

कृ.मा.प

a1



मागणी करण्यात येते.याप्रमाणे सर्व मालमत्ताधारकांना मागणीची बिले देऊन कराची वसुली करण्यात येते. सदर आदेशाची अंमलबजावणी काटेकोर व त्वरीत परिणामाने व्हावी .

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

प्रतीलीपी योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

1.अप्पर आयुक्त व उपआयुक्त,(महसूल/विकास/सामान्य) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

2.मुख्य लेखा परीक्षक,मुख्यलेखाधिकारी व सर्व क्षेत्रिय अधिकारी,क्षे.का.क्रं.1ते6, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

[illegible]

[illegible]

" सुधारणा आदेश "

जावक क्रमांक / कर विभाग / 30061 /2013

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

दिनांक 17 FEB 2014

विषय :- भांडवली मुल्याधारीत पध्दतीने मालमत्ता कर आकारणी 2011-12 आदेश सुधारणा व कर सुट व थकबाकीवरील शास्ती माफी योजनेस मुदत वाढीबाबत .

संदर्भ :- 1 सर्व साधारण सभा ठराव क्र 128 दिनांक 31/08/2013

2 कार्यालयीन आदेश क्र करवि /12675/13 दिनांक 16/9/2013 .

3 कार्यालयीन आदेश क्र. करवि / 26683/14 दिनांक 20/1/2014

4 सर्व साधारण सभा ठराव क्र 195 दिनांक 28/01/2014 .

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताची कर आकारणी भांडवली मुल्याधारीत पध्दतीने करण्यात आली असुन संदर्भ क्र.1 नुसार कर आकारणीबाबत सर्वसाधारण सभेने कर आकारणीस मान्यता प्रदान करुन सामान्य कराचे दर 0.30% ऐवजी 0.15% निश्चीत केले आहेत .

तथापी सर्वसाधारण सभेने संदर्भ क्र. 4 च्या ठरावाव्दारे महासभेने पुनरकर आकारणी करण्याच्या संदर्भात जो निर्णय घेतला त्या निर्णयाप्रमाणे मालमत्ताधारकांना मालमत्ता कराच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत किंवा नाहीत याचे पुनरनिरीक्षण करण्यात यावे , चुकीच्या मालमत्ताकराच्या नोटीसा देण्यात आल्या असतील तर त्या दुरुस्त करण्यात याव्यात, असे सुचीत केले आहे.

त्यानुसार स्पष्ट करण्यात येते की सर्वसाधारण सभेच्या ठरावास अनुसरुन सामान्य कराचे दर 0.30% ऐवजी 0.15% करतेवेळी महानगरपालिकेस आर्थिक नुकसान होऊ नये म्हणुन सामान्य करासह उर्वरीत महानगरपालिकेच्या 5 मालमत्ता करांचा समावेश करुन मागील कर आकारणीत लागु शकणाऱ्या करापेक्षा कर कमी होणार नाहीत याची दक्षता घेऊन मालमत्ताधारकाकडे कराची मागणी करण्यात आली आहे,व त्यानुसारच मालमत्ताधारकांना देयके देऊन कर वसुली देखील करण्यात येत आहे. परंतु अशा कर आकारणीत काही मालमत्ताधारकांनी आक्षेप घेतल्यास त्यांना सुनावणी देऊन त्याबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल .

तसेच मालमत्ताधारकाला कर भरण्यास पुरेसा कालावधी न मिळाल्यामुळे सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार दिनांक 28 फेब्रुवारी 2014 पर्यंत जे मालमत्ताधारक थकीत करासह चालु वर्षाचा अविवादीत कर भरणा करतील, त्यांना मालमत्ताकरात 2 टक्के सुट व थकबाकीवरील शास्ती 100 टक्के माफ करण्यात येते

सन 2013-14 चा मालमत्ता कर भरण्याचा व सवलत लाभाचा दिनांक 31 जानेवारी 2014 शेवटचा,
31 मार्च नंतर दर महा 2% शास्ती घ्या.

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
### (कर विभाग)

तसेच अनधिकृत बांधकामाबाबत शासनस्तरावर काही धोरण निश्चीती होत असल्याचे [illegible] नमुद केल्याने, अनधिकृत बांधकाम शास्ती भरण्याबाबत सक्ती करण्यात येणार नाही, परंतु जो पर्यंत बांधकाम नियमीत होत नाही, तो पर्यंत अनधिकृत बांधकाम शास्ती रक्कम देयकातुन कमी करता येणार नाही. मालमताधारकानी आपले बांधकाम नियमीत करवुन घेतले नंतर, अनधिकृत बांधकाम शास्ती रक्कम मागणी बंद करण्यात येईल, अथवा शासनाचे निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

आदेशाची अंमलबजावणी त्वरीत परिणामाने करण्यात यावी .

Clean d/c

उपआयुक्त
(महसुल)

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रतिलीपी -

1 उपआयुक्त ( विकास / महसूल / सामान्य ) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
2 अंतर्गत लेखा परिक्षण विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
3 मुख्य लेखाधीकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
4 सहा आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी कार्यालय क्र.1 ते 6,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

सन 2013-14 चा मालमत्ता कर भरण्याचा व सवलत लाभाचा दिनांक 31 जानेवारी 2014 शेवटचा,
31 मार्च नंतर दर महा 2% शास्ती चा.